# प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश यांचे कार्यालय,बुलढाणा

पहा :- १. मा. उच्च न्यायालय, मुंबई पत्र क्रं. **General (Adm.)/Judl./2007.**
दिनांक ११.०६.२००७ व त्यासोबतचे परिपत्रक.
२. दिवाणी नियमावलीचे प्रकरण **XXXVI** मधील परिच्छेद ७०१.

## आदेश

दिनांक **१५.११.२०२४**

महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रीक निवडणूक नोव्हेंबर-२०२४ कार्यक्रमानुसार बुलढाणा जिल्हयातील सर्व तालुक्याच्या ठिकाणी/विधानसभा मतदारसंघामध्ये मतदान दि.२०.११.२०२४ रोजी होणार आहे.

त्याअनुषंगाने जिल्हा न्यायालय बुलढाणा व त्यांचे अधिनस्थ असणारी सर्व न्यायालये व कार्यालयमध्ये कार्यरत सर्व अधिकारी व कर्मचारी यांना मतदाना करीता दि.२०-११-२०२४ रोजीची स्थानिक सुटी जाहीर करण्यात येत आहे.

तसेच सर्व न्यायीक अधिकारी यांना निर्देशित करण्यात येते की त्यांनी दि.२०-११-२०२४ रोजी च्या दैनिक दिवाणी व फौजदारी वादसुची मधील सर्व प्रकरणे नजिकच्या काळात ठेवण्याची व्यवस्था करावी.

तरी सर्व सबंधीतांनी याची नोंद घेऊन त्या प्रमाणे कार्यवाही करावी व न्यायालयाच्या सुचना फलकावर सदर सुचना प्रसिध्द करुन सर्व संबधीत पक्षकारापर्यंत व सर्व विधीज्ञा पर्यंत सुचना पोहचण्याची व्यवस्था करावी.

वरील प्रमाणे अधिसुचीत केलेल्या सुट्टीची भरपाई होण्याच्या दृष्टीने आवश्यकता भासल्यास स्वतंत्ररीत्या आदेश निर्गमित केले जातील.

15/11/24

( एस.सी.मुनघाटे )
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
बुलढाणा.